आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ ऑक्टोबर २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्रीय पथकाचा राज्यातल्या दुष्काळग्रस्त भागात पाहणी दौरा सुरू

- सीजेपीच्या दिल्लीतल्या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली, नवी दिल्लीत पोहोचणाऱ्या बहुतांश रेल्वे गाड्याही रद्द

- तमिळनाडू, पुदुच्चेरी, आसाममधल्या पोटनिवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षाचे उमेदवार आघाडीवर

- अमेरिकेत काम करणाऱ्या भारतीयांबद्दल अमेरिकेनं केलेल्या वक्तव्यावर भारताकडून तीव्र शब्दांत आक्षेप

**आणि**

- भारतीय वैमानिक स्मित मच्छार यांना इस्रायल सर्वोच्च नागरी शौर्य पुरस्कार देणार

<><><><><>

मराठवाड्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाने आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात देमनी शिवारात पाहणी केली. यावेळी शेतकरी विलास देविदास शिंदे यांच्या शेतातील पाण्याअभावी करपलेल्या सोयाबीन पिकाची पाहणी करून पथकानं शेतकऱ्यांशी संवाद साधला.

हे केंद्रीय पथक आज आणि उद्या बीड जिल्ह्याचा दौरा करणार आहे. गेवराई, बीड आणि पाटोदा तालुक्यांतल्या दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून शेती आणि पिकांच्या नुकसानीची हे पथक माहिती घेणार आहे. पाहणी पूर्ण झाल्यानंतर उद्या दुपारी पथकाची जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक होणार असल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांच्या व्यतिरीक्त आणखी १८ तालुक्यांमध्ये ५ पीकांचे २० टक्के सर्वेक्षण, ग्राऊंड ट्रुथिंग करण्याचा शासन आदेश सरकारनं आज जारी केला. विविध निकषांमुळं या तालुक्यांचा समावेश दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये

झाला नव्हता. त्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार राज्य सरकारनं या १८ तालुक्यात दुष्काळ सर्वेक्षण करायचा निर्णय जाहीर केला.

<><><><><>

दिल्लीत जंतरमंतर इथं उद्या होणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. जंतर मंतरवर निदर्शनं किंवा इतर कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यासाठी किमान १० दिवस आधी परवानगीचा अर्ज सादर करणं आवश्यक असतं. सीजेपीला यापूर्वीही जंतरमंतर वर आंदोलन करण्याची परवानगी दिली होती, मात्र त्यांनी मार्गदर्शक तत्वं आणि हमीपत्राचं पालन केलं नाही. त्यामुळे आंदोलनाला परवानगी देण्यात आलेली नाही, असं दिल्ली पोलिसांच्या सह आयुक्त नुपूर प्रसाद यांनी आज वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं. सार्वजनिक सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता'च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश सध्या या भागात लागू आहेत. कायद्याचं उल्लंघन करणाऱ्या कोणावरही दिल्ली पोलीस योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, दिल्लीत आज दुपारी २ वाजल्यानंतर आपल्या मूळ स्थानकांवरून सुटणाऱ्या आणि उद्या पहाटे ४ ते दुपारी २ या वेळीत नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दिन स्थानकांवर पोहोचणाऱ्या सर्व मेल आणि एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या जातील, अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली आहे.

<><><><><>

तमिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील पाच विधानसभा मतदारसंघांच्या, तसेच आसाममधील एका लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी सुरू आहे. पुद्दुचेरीत थट्टानचावडी विधानसभा पोटनिवडणुकीत सत्ताधारी AINRC पक्षाचे अशोक आनंद विजयी झाले आहेत. त्यांनी काँग्रेसच्या ई. विनयगम यांचा ८ हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव केला. पश्चिम बंगाल विधानसभा पोटनिवडणुकीत रेजीनगर इथे भाजप उमेदवार शंकरव सरकार आणि आम जनता उन्नयन पक्षाचे गुलाम नबी आझाद यांच्यात लढत सुरू आहे. शंकरव सरकार सध्या आघाडीवर आहेत. नंदिग्राममध्ये भाजप उमेदवार हसीरानी रथ आणि काँग्रेस उमेदवार मिलन प्रधान यांच्यात लढत सुरू असून इथेही भाजप उमेदवार हसीरानी रथ आघाडीवर आहेत. दोन्ही जागांसाठी एकूण १५ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होत आहे.

तमिळनाडू विधानसभेच्या मदुरांतकम आणि धारापुरम इथल्या पोटनिवडणुकीत सत्ताधारी टीव्हीके पक्षाने दोन्ही मतदारसंघांत आघाडी घेतली आहे. आघाडीवर असलेले उमेदवार मरगथम कुमारवेल आणि सत्यभामा यांनी यापूर्वी अण्णा द्रमुक पक्षाचा राजीनामा दिला होता आणि निवडणुकीनंतर ते सत्ताधारी टीव्हीके पक्षात सामील झाले होते. त्यांच्या राजीनाम्यामुळेच या पोटनिवडणुका घेण्यात आल्या होत्या. तसंच, दोन्ही मतदारसंघांत अण्णा द्रमुकचे उमेदवार पिछाडीवर आहेत.

आसाममध्ये नागाव या लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजप आणि ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट यांच्यात लढत होत आहे. या लढतीत भाजप उमेदवार देवाशिष शर्मा आघाडीवर आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला ७ ऑक्टोबर रोजी २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहेत नव्या शैक्षणिक धोरणाबद्दल.

नव्या शैक्षणिक धोरणाला केंद्रीय मंत्रिमंडळानं २९ जुलै २०२० रोजी मंजुरी दिली होती. देशात वर्षानुवर्षं सुरू असलेली १० अधिक २ अशी शालेय शिक्षणव्यवस्था, या नव्या धोरणामुळे ५ अधिक ३ अधिक ३ अधिक ४ अशी झाली. यामुळे ३ ते १८ वर्षं हा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचा अतिशय महत्त्वाचा काळ पहिल्यांदाच शिक्षणव्यवस्थेच्या परिघात आला. या धोरणात विद्यार्थ्याची मातृभाषा ही किमान ५ वीपर्यंत त्याची मुख्य शैक्षणिक भाषाही झाली. नवीन शैक्षणिक धोरणामुळे कला, विज्ञान, वाणिज्य आणि व्यवसायाभिमुख शिक्षण यांच्यातली दरी दूर झाली. यानंतर २०२१मध्ये निपुण भारत योजनेमुळे तिसरीपर्यंत मूलभूत शिक्षण आणि अंक ओळख अधिक सोपी झाली, तसंच विद्या प्रवेश योजनेद्वारे ही योजना देशभरातल्या जवळपास ९ लाख शाळांमधल्या ४ कोटीपेक्षा

जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. नव्या शैक्षणिक धोरणामुळे १९६८नंतर पहिल्यांदाच देशातल्या शालेय शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल झाले.

<><><><><>

अमेरिकेत काम करणाऱ्या भारतीयांबद्दल अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी केलेल्या वक्तव्यांवर भारतानं तीव्र शब्दांत आक्षेप नोंदवला आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या भारताच्या काही कंपन्यांची पर्म, अर्थात पर्मनंट लेबर सर्टिफिकेशन योजना अमेरिकेनं काल रद्द केली. यासंदर्भात उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स बोलत होते. ही वक्तव्यं पूर्णपणे अनुचित आणि अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि नवोन्मेष परिसंस्थेतल्या भारतीयांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करणारी असल्याची टीका परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं निवेदनात केली आहे. स्थलांतरितांच्या कित्येक पिढ्यांचे कष्ट, उद्यमशीलता आणि नवोन्मेषानं अमेरिकेच्या वाढीला आणि समृद्धीला हातभार लावल्याची बाब मंत्रालयानं अधोरेखित केली आहे. पर्म योजना रद्द झाल्याने यापूर्वी जारी केलेले एच-वन बी व्हिजा अवैध ठरत नाहीत, किंवा या व्हिजाधारकांचा आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना फटका बसत नाही, मात्र ग्रीन कार्ड मिळवण्याच्या प्रक्रियेवर याचा परिणाम होऊ शकतो, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

इन्फोसिस, टीसीएस, विप्रो, एचसीएल या भारतीय कंपन्यांबरोबरच कॉग्निझंट, कॅपजेमिनी, मायक्रोसॉफ्ट आणि ॲडोबी या कंपन्यांच्या पर्म योजनेवर अमेरिकेनं निर्बंध लादले आहेत. या कंपन्या अमेरिकन नागरिकांच्या जागी, कमी वेतनात काम करणाऱ्या परदेशी कामगारांना नोकऱ्या देत असल्याचा आरोप उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी केला. प्रतिभावंत आणि कुशल परदेशी नागरिकांचं स्वागत अमेरिका करत राहील, मात्र एच वन-बी व्हिजाचा मूळ उद्देश मागे पडला आहे, असंही ते म्हणाले.

या कंपन्यांवर त्यांनी केलेल्या आरोपांबाबतचे कोणतेही तपशीलवार निष्कर्ष सरकारने दिलेले नाहीत. मायक्रोसॉफ्टनं हे आरोप फेटाळून लावले आहेत.

<><><><><>

भारतीय वैमानिक स्मित मच्छार यांना इस्रायलचा सर्वोच्च नागरी शौर्य पुरस्कार दिला जाणार आहे. इस्रायलचे राष्ट्रपती आयझॅक हर्जोग यांनी आज ही घोषणा केली. कॅप्टन मच्छार यांच्यासह दुबई ते तेल अविव दरम्यानच्या विमानातून प्रवास करणाऱ्या अन्य पाच जणांनाही हा शौर्य पुरस्कार प्रदान केला जाईल.

दरम्यान, कॅप्टन मच्छार यांच्या सन्मानार्थ केरळमध्ये भारतीय टपाल विभागातर्फे एक विशेष टपाल तिकीट जारी केलं जाणार आहे.

**<><><><><>**

गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात खावडा गावाजवळ आज पहाटे झालेल्या अपघातात ७ कामगारांचा मृत्यू आणि २० पेक्षा अधिक जखमी झाले. ट्रक आणि टेम्पोच्या यांच्यात ही धडक झाली. हे सर्वजण कामगार होते.

//<><><><><>//